# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – २२६१७९६९ फॅक्स – २२६९०००७

E-mail : desk18@dtemaharashtra.com Internet : www.dtemaharashtra.gov.in

**अतितात्काळ व अति महत्त्वाचे**
रजिस्टर एडी

जा.क्र.१८/तशिसं/ईबीसी/२०१७/८२
दिनांक : ०९/०६/२०१७

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय : **सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना योजनांची माहिती करुन देणेबाबत....**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन योजनांची सोबत जोडलेली माहिती आपल्या विभागाअंतर्गत येणा-या Facilitation Center व ARC Center (Admission Reporting Center) यांना त्वरित पाठवावीत व संस्थाना सदर दिलेली माहिती संस्थेच्या इमारतीच्या दर्शनी जागेवर लावण्याबाबत निर्देश देण्यात यावेत, जेणेकरुन सदर योजनांचा लाभ संबंधित विद्यार्थ्यांना घेता येईल.

Programmer
३१.०५.१७
[illegible]

( डॉ. सुभाष महाजन )
सहसंचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

\\192.168.1.9\Desk18\Minority cell\Shaskiya patra\From 2016-17\Letter to RO.doc

# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

### ➢ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-

- मान्यता प्राप्त संस्थांमध्ये पात्र व्यावसायिक अभ्यासक्रमांत प्रवेश घेणारे अर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी केवळ निधी अभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित राहू नयेत म्हणून, एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय.
- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि. १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क योजनेंतर्गत ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये ६.०० लाखापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून घेतल्यास त्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० % शिष्यवृत्ती म्हणून अदा करण्यात येईल.
- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून ही रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलंग्नित बँक खात्यामध्ये शिष्यवृत्ती स्वरुपात जमा करण्यात येईल.
- पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा :-
  **अ)** रु.२.५० लाख व त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी/बारावी) गुणांच्या टक्क्यांची अट लागू नाही.
  **ब)** रु.२.५० लाखापेक्षा अधिक ते रु.६.०० लाखा पर्यंत वार्षिक उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी/बारावी) गुण ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक.

### ➢ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

- दि. १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयाद्वारे डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुरु करण्यात आली असून राज्यातील अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरातील संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिवर्ष रु.३०,०००/- व इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना रु.२०,०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता आधार संलंग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

❖ **टिपः-** योजने बाबतची पात्रता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळ- www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध.